दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.३० नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ९९ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Sun 30 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 99 | Pages 4 | Rate 4 Rs

### पुणे खासदार क्रीडा महोत्सवाचा समारोप

**पुणे** –खासदार क्रीडा महोत्सवाचा गुरुवारी गणेश कला क्रीडा रंगमंच येथे समारोप झाला. या महोत्सवात ४४ हजार खेळाडूंनी सहभाग घेतला. समारोप प्रसंगी अभिनेता अक्षय कुमार उपस्थित होते. 'उत्तम आरोग्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे,' असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.अक्षय कुमार म्हणाले की, सध्याची लहान मुले मोबाइल गेममध्ये रमलेली दिसतात, त्यामुळे मैदानावर येणाऱ्या मुलांची संख्या कमी झाली आहे. अशा परिस्थितीत पुण्यातून ४४ हजार खेळाडू मैदानात उतरतात, ही एक मोठी आणि कौतुकास्पद बाब आहे. खेळांमुळेच उत्तम आरोग्य घडते, असेही त्यांनी अधोरेखित केले.

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा 'ॲक्शन प्लॅन'

# बोगस जन्म-मृत्यू दाखले रद्द करण्याचे आदेश, राज्यातील १४ शहरे रडारवर

मुंबई (वृत्तसंस्था)–राज्यात बेकायदेशीरपद्धतीने व खोट्या कागदपत्रांच्या आधारे मिळविलेल्या जन्म–मृत्यू दाखल्यांचे रॅकेट मोडून काढण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कंबर कसली असून, केवळ आधार कार्डच्या पुराव्यावर दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म–मृत्यूचे दाखले आणि नोंदी तात्काळ रद्द करून, पोलिसात तातडीने तक्रार दाखल करण्याचे करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.याबाबतचे परिपत्रक आज महसूल विभागाने जारी केले असून तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांना सोळा मुद्द्यांच्या आधारे जन्म–मृत्यू दाखल्याची तपासणी करावी असे सुचविण्यात आले आहे. अतिरिक्त मुख्य सचिव गृह व अतिरिक्त मुख्य सचिव महसूल यांच्या उच्चस्तरीय बैठकीतील सूचनानंतर महसूल मंत्री बावनकुळे यांनी आदेश दिले.

### खोट्या नोंदी आढळल्यास थेट गुन्हा दाखल

महसूलमंत्री बावनकुळे यांच्या निर्देशानुसार, अर्जातील माहिती आणि आधार कार्डवरील जन्मतारीख यामध्ये तफावत आढळल्यास संबंधित व्यक्तीवर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. तसेच, जे लाभार्थी मूळ प्रमाणपत्र परत करणार नाहीत किंवा जे आता सापडत नाहीत, त्यांची यादी बनवून त्यांना 'फरार' घोषित करण्याची प्रक्रिया आणि त्यांच्यावर एफआयआर (FIR) दाखल करण्याची स्थानिक पोलिसांनी करावी असे म्हटले आहे.

११ ऑगस्ट २०२३ च्या सुधारणेनंतर नायब तहसीलदारांनी वितरीत केलेले जन्म–मृत्यू नोंदीचे आदेश परत घेण्याचे आणि रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, ज्या प्रकरणांमध्ये केवळ आधार कार्डला पुरावा मानून जन्म मृत्यू दाखले दिले गेले आहेत, ते आदेश त्रुटीपूर्ण मानले जातील. आधार कार्ड हा जन्माचा किंवा जन्म ठिकाणाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरता येणार नाही, असे महसूल विभागाने केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांचा हवाला देऊन स्पष्ट केले आहे. विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांच्या देखरेखीखाली विशेष मोहीम राबवून विशेष मेळाव्याद्वारे या कामाचा निपटारा केला जावा असे बजावण्यात आले आहे.



### राज्यातील 'ही' शहरे रडारवर

अवैध जन्म–मृत्यू प्रकरणांमध्ये राज्यातील काही विशिष्ट शहरे आणि तालुके 'हॉटस्पॉट' असल्याचे दिसून आले आहे. यामध्ये अमरावती, सिल्लोड, अकोला, छत्रपती संभाजीनगर शहर, लातूर, अंजनगाव सुर्जी, अचलपूर, पुसद, परभणी, बीड, गेवराई, जालना, अर्धापूर आणि परळी या ठिकाणांचा समावेश असून, येथील तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना ही प्रकरणे गांभीर्याने तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## बीड पोस्टल को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी अमरसिंग ढाका यांची बिनविरोध निवड

### उपाध्यक्षपदी किरण सावंत तर सचिव पदी नितीन आमटे यांची बिनविरोध निवड

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**



बीड पोस्टल को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड संस्थेच्या संचालक मंडळातून उर्वरित कालावधीसाठी अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव यांची निवड करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. संचालक मंडळाची सभा दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्यात आली होती या सभेमध्ये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांनी बीड पोस्टल को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड बीड या संस्थेच्या संचालक मंडळातून अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव यांची निवड करण्यासाठी मुख्य पोस्ट ऑफिस येथे सभा घेण्यात आली या सभेमध्ये अध्यक्षपदासाठी अमरसिंग ढाका यांचा एकमेव अर्ज आला व त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली ते या अगोदर सचिव म्हणून कार्यरत होते.तसेच उपाध्यक्ष पदासाठी ही किरण सावंत यांचा व सचिव पदासाठी नितीन आमटे यांचाही एकमेव अर्ज आला व तिघांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी सर्व संचालक मंडळ सदस्य उपस्थित होते त्यामध्ये,सहकारी संस्था चे अध्याशी अधिकारी म्हणून श्री रामचंद्र ठोसर साहेब व सोबतीला श्री सिद्धेश्वर सांगुळे हे हजर होते. श्री विष्णू किसन वीर, धनंजय शेंडगे, भारत भूषण वारंगुळे, विशाल घोरड, सुबोध कांबळे, सत्य कुमार कुलथे, दत्तात्रेय गाडेकर, श्रीमती अनिता क्षीरसागर व प्रतीक्षा तवरे हे सर्व संचालक उपस्थित होते व संविधान वीर व शिवाजी पवार हे कर्मचारी हजर होते.

## संविधान दिन व महात्मा फुले स्मृतीदिनाचे औचित्य साधून संविधानाचे वाटप

### आझाद क्रांती सेना व लहुजी क्रांती मोर्चाच्या वतीने उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



भारतामध्ये दरवर्षी दि. २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान सभेत मंजूर करण्यात आले.हा दिवस भारतीय संविधान तयार करणाऱ्या सर्व विधिज्ञ,सदस्य,आणि विशेषतः डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी साजरा केला जातो. संविधान प्रत्यक्ष अंमलात २६ जानेवारी१९५० रोजी आले,पण मंजुरीचा दिवस म्हणून २६ नोव्हेंबर अत्यंत महत्त्वाचा आहे.संविधान दिन व महात्मा फुले स्मृतीदिनाचे औचित्य साधून आझाद क्रांती सेना व लहुजी क्रांती मोर्चाच्या वतीने २८ नोव्हेंबर रोजी केज शहरातील अनेक मान्यवरांना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. बाबुराव गालफाडे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधानाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले.केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री. नागरगोजे साहेब,केज पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक श्री.नितीन मांजरमकर साहेब, केजच्या पुरवठा विभागा च्या नायब तहसीलदार मा.श्री.रामटेके मॅडम यांना संविधानाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले.यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शक श्री.बाबुराव गालफाडे सर,आझाद क्रांती सेनचे तालुका प्रमुख श्री.शरद थोरात,आझाद क्रांती सेनचे तालुका उपप्रमुख अनिल लोखंडे,आझाद क्रांती सेनेचे शहर प्रमुख इरफान पठाण, बाळासाहेब जोगदंड सर, एस.के.वैरागे,शाम गालफाडे,सूर्यकांतलांडगे, बाळासाहेब पोळ,लखन पोळ,भागवत जोगदंड, सतीश शिंदे,आश्रूबा खाडे,साहिल तांबोळी, ईश्वर बारगजे,अमन पठाण,गोविंद चौरे,इम्रान तांबोळी इत्यादी उपस्थित होते.

## नांदेड मध्ये राज्याचा गौरव! राष्ट्रीय ड्रॅगन बोट स्पर्धेत शिवम मोराळे याने मिळविले ब्राँझ पदक

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

नांदेड येथे झालेल्या १२ व्या नॅशनल ड्रॅगन बोट चॅम्पियनशिप २०२५–२६ या प्रतिष्ठित स्पर्धेत प्रगती विद्यालय,बीड येथील इयत्ता सातवीत शिकणाऱ्या चि.शिवम अमोल मोराळे याने उल्लेखनीय कामगिरी करत ब्राँझ पदक मिळवून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले.या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातील २५ राज्यांचे संघ सहभागी झाले होते. तीव्र स्पर्धेतही शिवम ने दमदार प्रदर्शन करत आपल्या क्रीडा क्षमतेची चमक दाखवली. शिवमच्या या उज्ज्वल यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाची दाद मिळत असून त्याच्यावर अभिनंदनांचा वर्षाव होत आहे.तो केज तालुक्यातील ज्येष्ठ विधिज्ञ ड.उद्धवराव मोराळे



यांचा नातू तसेच नांदुरघाट येथील डॉ. अमोल मोराळे यांचा मुलगा आहे.शिवमने मिळवलेले हे यश बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यासाठी अभिमानास्पद ठरत असून त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्तएस यांच्या सह अधिकारी व अंमलदारांचा उत्स्फूर्त सहभाग

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूर वीरांच्या स्मृतींना उजाळा देत, नंदुरबार जिल्हा पोलीस दलाने आपली सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीची भावना सिद्ध केली आहे. २६/११/२००८ रोजी मुंबई येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या हुतात्म्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, दिनांक २६/११/२०२५ रोजी पोलीस मुख्यालय, नंदुरबार येथे एका भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.
या शिबीराचा मुख्य उद्देश शहीद जवानांना आदरांजली वाहणे आणि त्याचबरोबर रक्तदान करून गरजूंना जीवदान देण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करणे हा होता. पोलीस दल केवळ कायदा आणि सुव्यवस्था राखणारे दल नव्हे, तर संकटात



समाजाच्या मदतीला धावून जाणारे संवेदनशील घटक देखील आहे.हे या कृतीतून दाखवून दिले.
जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्तएस यांच्या विशेष उपस्थितीत आणि जिल्हा रुग्णालयाच्या सहकार्याने हे शिबीर आयोजित करण्यात आले होते.
यावेळी पोलीस अधीक्षक श्रवण दत्तएस यांनी शिबीराला भेट दिली इतकेच नव्हे, तर स्वतः रक्तदान करून एक आदर्श घालून दिला. त्यांनी जिल्हा पोलीस दलातील जास्तीत जास्त अधिकारी, अंमलदार आणि कार्यालयीन स्टाफ यांना रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहित केले, ज्यामुळे पोलीस दलातील सहभाग अत्यंत उत्स्फूर्त राहिला.
कार्यक्रमावेळी अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे, पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) अनिल पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, तसेच जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी डॉक्टर रमा वाडीकर व इतर वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.
या रक्तदान शिबीरात विविध पोलीस ठाणे, कार्यालयशाखा, तसेच पोलीस मुख्यालय येथील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन स्टाफ अशांनी स्वेच्छेने सहभाग घेतला. नंदुरबार पोलीस दलाच्या या उपक्रमाने शहीद वीरांना योग्य श्रद्धांजली अर्पण केली असून, त्यांच्या या संवेदनशील कृतीमुळे जनमानसात पोलिसांची प्रतिमा अधिक उंचावली आहे.

## केज तालुक्यातील युसुफ वडगाव जिल्हा परिषद सर्कलमध्ये ॲड.मनीषा कुपकर पाटील यांच्या उमेदवारीची जोरदार मागणी

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सुर्डी गावातील झुंजार आणि लोकाभिमुख महिला. नेत्या म्हणून परिचित असलेल्या ॲड.मनीषा कुपकर पाटील यांच्या जिल्हा परिषद निवडणुकीतील संभाव्य उमेदवारीबाबत समाजा तून मोठ्या प्रमाणावर मागणी वाढत आहे. शिवसंग्राम महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले व्यापक काम तसेच अलीकडेच झालेल्या बीड जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत महिला प्रतिनिधी म्हणून मिळवलेले घवघवीत यश लक्षवेधी ठरले आहे. मनीषाताई यांनी गेल्या अनेक वर्षांपासून महिलांच्या हक्कांसाठी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आणि गरजू घटकांसाठी सातत्याने संघर्ष केला आहे.विविध सरकारी योजनांची माहिती महिलांपर्यंत पोहोचवणे, शेतकऱ्यांच्या अडचणींना न्याय मिळवून देणे यासह अनेक सामाजिक उपक्रमांत त्यांनी अग्रणी भूमिका बजावली आहे. मराठाआरक्षण आंदोलना दरम्यान जाळपोळीच्या प्रकरणांत अन्यायाने अडकलेल्या अनेक मराठी तरुणांचे मोफत जामीन करून देत त्यांनी त्यांच्या कुटुंबांना मोठा दिलासा दिला.कोणत्याही वंचित, पीडित व्यक्तीने मदतीचे आवाहन केल्यास तात्काळ प्रतिसाद देणे ही त्यांच्या कार्यशैलीची ठळक बाजू मानली जाते.
त्यांच्या तडफदार नेतृत्व शैलीमुळे,कायदेविषयक जाणिवेमुळे आणि लोकाभिमुख कार्यपद्धती मुळे केज तालुक्यातील युसुफ वडगाव जिल्हा परिषद सर्कल मध्ये त्यांच्या उमेदवारीबाबत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे या सर्कलमधून जिल्हा परिषद निवडणुकीत त्यांना संधी देण्यात यावी,अशी एकमुखी मागणी नागरिक महिला बचतगट,शेतकरी वर्ग व सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे. समाजाने दाखवलेला विश्वास मोठा आहे. युसुफ वडगाव जिल्हा परिषद सर्कलच्या विकासासाठी मी पूर्ण ताकदीने काम करणार आहे असेही मनीषाताईंनी सांगितले.



संपादकीय

## बिघडलेल्या हवेचे वर्तमान

मुंबईची हवा सध्या पूर्ण बिघडली आहे. राजकारणाने नाही; हवेतील धुलीकणांनी. राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका सुरू असल्याने राजकीय धुरळा सध्या महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात उडतो आहे. मुंबईलगतच्या जिल्ह्यांमध्ये नेत्यांच्या झुंजी लागल्या आहेत. पण, महानगरपालिकांच्या क्षेत्राने वेढलेल्या मुंबईपासून या नगरपालिका थोड्या अंतरावर असल्याने त्या मैदानावरची धूळ मुंबईत पोहोचण्याचा प्रश्न नाही. मुंबईची हवा बिघडली आहे, ती मुंबईतल्याच घटकांमुळेच. सरकारी यंत्रणांनी याही बाबतीत आपल्यावरची जबाबदारीची धूळ झटकताना इथिओपियातील ज्वालामुखीचं कारण पुढे करून पाहिलं. पण, न्यायालयाने ऐकलं नाही. इथियोपियातल्या ज्वालामुखीतून उडालेल्या राखेचा काही अंश भारतीय अवकाशात आला आणि त्याचा काही भाग मुंबईच्या आकाशात पसरल्याने या आठवड्यात विमानसेवा विस्कळीत झाली होती, हे खरं. पण, न्यायालयाने या यंत्रणांना सुखासुखी सोडलं नाही. 'त्या राखेचं कारण सांगू नका. राख आली असली, तरी तिकडे ज्वालामुखीचा उद्रेक होण्याआधीही इथली हवा बिघडलेलीच होती. त्याचं कारण काय ते सांगा', असं न्यायालयानेच खडसावल्याने यंत्रणांना दुसरं कारण पुढे करावं लागलं. उगीच परकीय कारणांवर जबाबदारी झटकून मोकळं कशाला व्हायचं? बरं, या यंत्रणांना वायू प्रदूषण मान्य नाही, असं नाही. हे प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांची यादी त्यांनी करून ठेवली आहे. वायू प्रदूषण किती पातळीपर्यंत सहन करायचं, प्रदूषणाची पातळी सलग तीन दिवसांपेक्षा अधिक २०० एक्यूआयपेक्षा वर राहिली, तर कोणी काय करायचं हेही ठरलं आहे. अधिकाऱ्यांच्या संयुक्त जबाबदाऱ्याही निश्चित आहेत. पण, तरीही 'शक्यतो काहीच करावं लागलं नाही तर उत्तम' या मुरलेल्या वृत्तीने इथिओपियाच्या ज्वालामुखीवर खापर फोडण्याचा प्रयत्न झाला. हवेतलं वायू प्रदूषण मोजण्यासाठी मुंबईत अनेक ठिकाणी मापन यंत्र बसवलेली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, आयआयटी बॉम्बे आणि महानगरपालिका या तीनही यंत्रणांची यंत्र हवेची गुणवत्ता तपासत असतात. पण, दुर्दैवाने त्यात कुठेही सुसूत्रता दिसत नाही. अनेक यंत्र एकतर नादुरुस्त किंवा बंदच आहेत की काय कोणास ठाऊक? कारण, या यंत्रणांच्या अनेक केंद्रांवरची हवेच्या गुणवत्तेची आकडेवारी या महत्त्वाच्या दिवसांतही उपलब्ध नाही! याच यंत्रणेला न्यायालयाने आता सर्व बांधकामांच्या ठिकाणी हवेची शुद्धता मापक यंत्र बसवण्याचे आदेश दिले आहेत. बांधकामांच्या ठिकाणांची हवेची गुणवत्ता तपासा, जिथे हवा धोक्याच्या पातळीपर्यंत प्रदूषित असेल, तिथली बांधकामं तातडीने काही काळ थांबवा, असं न्यायालयाने आदेशात म्हटलं आहे. हे आदेश देताना अर्थात प्रकल्पाच्या आर्थिक गणिताचा विचार करायची सूचनाही केली आहे. न्यायालयाने दाखवलेली ही काळजी यंत्रणांसाठी (आणि संबंधित कंत्राटदारांसाठीही) पळवाट म्हणून उपयोगाला येईल, यात शंका नाही. दिल्लीतलं वायू प्रदूषण कमी दाखवण्यासाठी तिथल्या यंत्रणांनी हवेच्या गुणवत्ता मापक यंत्रांच्या भोवती पाणी मारण्यासाठी कसे टँकर लावले होते, हे आपण पाहिलेच आहेत. असे उपाय जे करतात, तेही याच प्रदूषित हवेतून श्वास घेतात. त्यांची कुटुंबही याच हवेतून प्राणवायू मिळवत असतात. पण, आपल्याकडे स्वतःच्या आणि इतरांच्या जगण्याच्या गुणवत्तेचा विचारच नसल्याने केवळ काही आमिषापोटी अशा गोष्टी केल्या जातात. आपण आपल्याबरोबरच इतरांचं आरोग्यही पणाला लावतो आहोत, याची जाणीव यांना नसते. त्यामुळे, मुंबईतही वेगळं काही घडेल, असं मानायला मन धजावत नाही. दिल्लीच्या वायू प्रदूषणाची तक्रार वर्षानुवर्ष आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब अशा जवळच्या राज्यांतील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातलं धसकट पेटवल्याने होणाऱ्या धुराने दिल्लीतली हवा बिघडते, असं वर्षानुवर्ष सांगितल्यानंतर यावर्षी या यंत्रणांनी वाहनांच्या वाढत्या उत्सर्जनाने हे प्रदूषण होतं आहे, असं सांगायला सुरुवात केली आहे. दिल्लीत घरात हवा शुद्ध करणारी यंत्र लागली आहेत. लोक ऑक्सिजनची पिशवी घेऊन, त्याची नळी नाकाला लावून फिरत नाहीत. पण ते दिवसही फार दूर नसतील. दिल्लीशी स्पर्धा करणाऱ्या मुंबईतही वेगळं काही घडणार नाही. समुद्रकिनारी असल्याचा फायदा नेहमी मिळत राहीलच असं नाही. ला निनाच्या प्रभावाने वाऱ्याच्या दिशा सतत बदलत आहेत. हे वारेच मुंबईचा श्वास कोंडल्याशिवाय राहणार नाहीत! महापालिकेने सध्या मुंबईतल्या वायू प्रदूषणाचं खापर शहरातील बांधकामांवर फोडलं असलं तरी ते एकमेव कारण नाही. कारवाईला जे सोपं असतं, ते कारण नेहमी पुढे केलं जातं. मुंबईतल्या प्रदूषणाला कारण वाहतूक कोंडीच आहे. सार्वजनिक व्यवस्था पंगू केल्याने मुंबईकरांना रोजच्या प्रवासासाठी खासगी गाड्या किंवा भाड्याने रिक्षा-टॅक्सी वापरण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. मुंबई वाढते आहे आणि मुंबईची आदर्शवत 'बेस्ट' सेवा रोडावते आहे. या सेवेच्या गाड्यांमध्ये वर्षागणिक वाढ व्हायला हवी होती, जुन्या मार्गांचे विस्तार व्हायला हवे होते, नवे मार्ग सुरू व्हायला हवे होते. प्रत्यक्षात यातलं काहीच होत नाही. रस्त्यांवरील अतिक्रमणांनी मार्गावर बस चालणं अवघड झालं आहे. ही सेवा उलट्या पायाने पळते आहे! त्यामुळे, मुंबईत गेल्या दहा वर्षांत चारचाकी वाहनांमध्ये तिप्पट आणि दुचाकींमध्ये पाचपटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे. रिक्षा-टॅक्सी बहुतांश सीएनजीवर चालताहेत. पण, सीएनजीसाठी त्यांना लांबच लांब रांगा लावाव्या लागताहेत. अनधिकृत रिक्षांचा सुळसुळाट, तर इतका आहे, की त्यांची संख्या एकूण संख्येच्या ३० टक्क्यांएवढी असावी, असा अंदाज आहे. मेट्रोच्या वापराचे आकडे जाहीर होतच असतात. तात्पर्य, मुंबईच्या हवेची गुणवत्ता वाहतुकीची गुणवत्ता सुधारल्याशिवाय शक्य नाही. ती सुधारणं महापालिकेला सहज शक्य आहे. त्यांनी ही जबाबदारी आपली मानली तर!

# वर्षभरानंतरही न्याय नाही बंधू धनंजय आणि लेक वैभवीने अजित पवार यांच्या समोर मांडली व्यथा!



दैनिक वादळ वार्ता

केज | प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्येला तिथीनुसार एक वर्ष पूर्ण झाले. त्यांना ह.भ.प समाधान महाराज शर्मा यांच्या अमृततुल्य अशा किर्तनरुपी सेवेतुन अभिवादन करण्यात आले तसेच अभिवादन करण्यासाठी या पार्श्वभूमी वर आज संघर्ष योध्दा मनोज पाटील,राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार,मा.विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे,वारकरी संप्रदायाचे अध्यक्ष ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले,तसेच जिल्ह्यातील आमदार,खासदार, समाजसेवक,राजकीय नेते मंडळी,सर्वांनी मस्साजोग येथे येऊन देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली.संतोष देशमुख यांची मुलगीवैभवी देशमुख हिच्या शिक्षणाची विचारपूस केली.हत्येला एक वर्ष झाले,तरी अजून आम्हाला न्याय मिळाला नाही,अशी खंत वैभवी देशमुख हिने व्यक्त केली. तर गावकऱ्यांनी देखील न्यायाची मागणी केली. गत वर्षी ९ डिसेंबर रोजी मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची अमानुष हत्या करण्यात आली होती.मारेकऱ्यांनी क्रौर्याची परिसीमा गाठली होती.या प्रकरणात सत्ताधारी आमदार धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराड यांच्यासह सात जणांना अटक करण्यात आली आहे.मात्र घटनेला एक वर्ष पूर्ण होत आले. तरीही न्यायालयात अजून आरोप निश्चित करण्यात आलेले नाहीत,तसेच एक आरोपी अद्यापही फरार आहे.त्यामुळे देशमुख कुटुंब आजही न्यायासाठी संघर्ष करत आहे.यावेळी संतोष देशमुखांची लेक वैभवी हिने सर्वांसमोर आपली व्यथा मांडली.मी शिक्षणासाठी दुसऱ्या गावी गेली असली,तरी माझे अर्ध लक्ष घरीच असते,असे ती म्हणाली. बाबांना जाऊन वर्ष होत आले,तरीअद्याप आम्हाला पाहिजे तसा प्रतिसाद कुठूनच भेटत नाही, आम्हाला न्याय मिळाला नाही,असे वैभवी देशमुख म्हणाली.

### वडिलांना न्याय मिळावा-वैभवी देशमुख

**बाबा जाऊन एक वर्ष झाले.अजूनही त्यातील एका आरोपीला अटक झालेली नाही.माझ्या वडिलांना लवकरात लवकर न्याय मिळावा, अशी मागणी वैभवीने सरकारकडे केली आहे.**

### अण्णावर जीवापार प्रेम करायचो

**दरम्यान,आज सकाळी संतोष देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांना भावाच्या आठवणीने अश्रू अनावर झाले. आपल्या भावाला जाऊन वर्ष झाले तरीही आम्हाला न्याय मिळत नाही.माझे माझ्या भावावर जीवापाड प्रेम होते,कर्ता माणूसच घरातून गेला आता आमचे कसे होणार?आमचा निष्पाप माणूस या क्रूरकर्मी लोकांनी कायमचा हिरावून नेला. आमचे हसते-खेळते कुटुंब दृष्ट लागल्यासारखे उध्वस्त झाले, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी संतोष यांची कन्या वैभवी हिने काका धनंजय यांचे सांत्वन करत त्यांचे अश्रू पुसले.हे दृश्य पाहून उपस्थितांचेही काळीज पिळवटून निघाले.**

# अवैध वाळू वाहतूक प्रकरणी नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई!

## ५५ टन वाळूसह रु.६०.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त; एकास अटक

दैनिक वादळ वार्ता

नंदुरबार | दिपक गोसावी

नंदुरबार शहरात अवैध वाळू विक्रीच्या उद्देशाने विनापरवाना वाहतूक करणाऱ्या एका हायवा ट्रकवर स्थानिक गुन्हे शाखेने २८/११/२०२५ रोजी मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत ५५ टन वाळू आणि हायवा ट्रकसह एकूण ६० लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांना नंदुरबार शहरात विनापरवाना अवैध वाळूची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांच्या मार्गदर्शनाखाली पाटील यांनी तात्काळ पथकास कारवाईसाठी रवाना केले.

पथक नंदुरबार शहरातील धुळे चौफुली परिसरात हजर असताना, नवापूर चौफुलीकडे जाणारा एम एच ४१ एटी ७४७३ क्रमांकाचा पांढऱ्या रंगाचा हायवा ट्रक त्यांनी दंडपाणेश्वर मंदिराचे जवळील परिसरात थांबवला.



वाहनावरील चालक हिरालाल बापू खैरनार (वय ३८, रा. वडेल, ता. मालेगाव, जि. नाशिक) याने वाळू वाहतुकीसाठी कुठलीही रॉयल्टी किंवा परवाना नसल्याचे तसेच वाळूची चोरून वाहतूक करत असल्याचे कबूल केले.

पोलिसांनी रु. ६६,०००/- किमतीची ५५ टन वाळूसह रु. ६०,००,०००/- किमतीचा टाटा कंपनीचा हायवा ट्रक असा एकूण रु. ६०,६६,०००/- किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

सदर वाहन नंदुरबार शहर पोलीस ठाणे येथे घेऊन जात असताना, आरोपी हिरालाल खैरनार याने जीपीएस सिस्टीम बंद करून वाहन लॉक केले आणि शासकीय कामात अडथळा निर्माण केला. त्यामुळे खैरनार याच्याविरुद्ध नंदुरबार शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६७२/२०२५ भा.न्या. संहिता कलम ३०३(२), १३२ सह पर्यावरण संरक्षण कायदा कलम ३, १५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांनी यावेळी स्पष्ट केले की, जिल्हा हद्दीत कुठल्याही प्रकारचे अवैध व्यवसाय व त्याची चोरटी वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, पोउपनि मुकेश पवार, विकास गुंजाळ, पोहेकॉ सुनिल येलवे, दिनेश चित्ते, ज्ञानेश्वर पाटील, दादाभाऊ वाघ, दादाभाई मासुळ अशांनी पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस आणि अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली केली आहे.

# तर्कशक्तीचा चमत्कार,अध्यात्माचा अविष्कार!-पाटोद्यातील राजेंद्र 'लोखंडे महाराज' यांना 'समाजरत्न' पुरस्काराने गौरव!

दैनिक वादळ वार्ता

आष्टी (प्रतिनिधी)

पाटोदा तालुक्यातील अध्यात्म, तर्कशास्त्र आणि भाकीतशक्तीचा अद्भुत संगम असलेले व्यक्तिमत्व - राजेंद्र गंगाराम लोखंडे उर्फ लोखंडे महाराज - यांना त्यांच्या विलक्षण कार्य,अद्वितीय तर्कशक्ती आणि समाजातील योगदानाबद्दल 'समाजरत्न पुरस्कार' जाहीर झाला आहे.दिघोळ (ता.पाटोदा) येथील रहिवासी असलेले लोखंडे महाराज काही वर्षांपूर्वी शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने पाटोद्यात स्थायिक झाले. शालेय जीवनापासूनच अध्यात्मिक प्रवृत्ती असलेले महाराज हे खेमानंद महाराज यांचे शिष्य असून,पुढे ह.भ.प.रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत त्यांनी कार्य केले. एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण करूनही त्यांचे लक्ष सदैव अध्यात्म आणि आत्मज्ञानाकडेच केंद्रित राहिले.ब्रहमचारी जीवन जगणारे लोखंडे महाराज यांच्याकडे एक अद्भुत तर्कशक्ती आहे - समोर आलेल्या व्यक्तीचा चेहरा पाहताच ते त्या व्यक्तीची जन्मतारीख,वार,आणि भविष्यातील घटनांचा वेध अचूकपणे सांगतात.

त्यांनी २०२० सालीच भाकीत केले होते की, आ.धनंजय मुंडे आणि लोकनेत्या पंकजाताई मुंडे मार्च २०२४ मध्ये पुन्हा राजकारणात एकत्र येतील, आणि हे भाकीत चपखल खरे ठरले!महाराजांना भूतकाळ आणि भविष्यकाळातील सण,वार आणि तारखा अगदी अचूक सांगण्याची चमत्कारिक किमया अवगत आहे. उदाहरणार्थ - २०४० साली ४ नोव्हेंबरला दिवाळी रविवार असेल,२०५५ साली २४ फेब्रुवारीला महाशिवरात्री बुधवार असेल,१९४७ साली ६ मार्चला होळी बुधवार होती,तर स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट शुक्रवार होता - अशा शेकडो उदाहरणांतून त्यांच्या अद्वितीय ज्ञानाची प्रचिती येते.राज्याच्या राजकारणापासून मानवाच्या आयुष्यापर्यंत - तर्क,श्रद्धा आणि अध्यात्म यांचे अनोखे मिश्रण मांडणारे लोखंडे महाराज हे आजच्या पिढीसाठी आदर्श आणि प्रेरणास्थान ठरत आहेत.चेहर्यातून जाणणारे भविष्य, तर्कशक्तीतून उलगडलेले सत्य - पाटोद्यातील लोखंडे महाराज ठरले खरे 'समाजरत्न'!



# हिवाळ्यात दररोज भिजवलेले बदाम आणि अंजीर खाल्ल्यास शरीराला मिळतात 'हे' जबरदस्त फायदे

हिवाळा सुरू झाल्याने आपण प्रत्येकजण शरीराला आतून उबदार ठेवण्यासाठी आहारात गरम पदार्थांचे समावेश करतात. शरीराला उबदार ठेवण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी नट्स हे सर्वोत्तम स्रोत मानले जातात. तुम्ही मनुका, बदाम, अंजीर आणि खजूर यांसारखे नट्स खाऊ शकता. हे सर्व नट्स त्यांच्या वेगवेगळ्या पौष्टिकतेसाठी आणि फायद्यांसाठी ओळखले जातात. मात्र जेव्हा शरीराला उबदार ठेवण्याचा विचार येतो तेव्हा बदाम आणि अंजीर हे सर्वोत्तम पर्याय मानले जातात.मात्र काही लोकं हिवाळ्यात रिकाम्या पोटी बदाम की अंजीर खाणे जास्त फायदेशीर आहे यामध्ये संभ्रमात असतात. जर तुम्हीही या दुविधेत असाल तर हा लेख तुमच्यासाठी आहे. आजच्या लेखात आपण तज्ज्ञांकडून जाणून घेऊयात की बदाम की अंजीर रिकाम्या पोटी अधिक फायदेशीर आहेत, त्यांच्या पौष्टिकतेसह आणि फायद्यांसह.

**अंजीर**

अंजीर हे एक पौष्टिक सुके फळ आहे आणि ते लोहाचा एक उत्कृष्ट स्रोत मानले जाते. त्यात फायबर, कॅल्शियम, पोटॅशियम, बी जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स देखील असतात. अंजीरमध्ये उष्णता निर्माण करणारा प्रभाव असतो, ज्यामुळे ते हिवाळ्यात खाण्यासाठी सर्वोत्तम बनतात. अशक्तपणाने ग्रस्त असलेल्यांसाठी अंजीर खाणे खूप फायदेशीर ठरू शकते. ते दररोज खाल्ल्याने पचन सुधारते, अशक्तपणा कमी होतो आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत होते.

**बदाम**

बदाम हे फायबरचा एक उत्तम स्रोत मानले जातात. बदाम दररोज खाल्ल्याने तुमची पचनसंस्था मजबूत होण्यास मदत होते. कारण यात निरोगी फॅट, व्हिटॅमिन ई, प्रथिने, मॅग्नेशियम आणि अँटीऑक्सिडंट्स देखील असतात. फायबरमध्ये समृद्ध असल्याने बदाम तुम्हाला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटण्यास मदत करतात, वारंवार भूक लागणे टाळतात आणि तुमचे वजन नियंत्रित करण्यास मदत करतात.

**बदाम की अंजीर रिकाम्या पोटी काय खावे?**

आयुर्वेद तज्ञ सांगतात की बदाम आणि अंजीर हे दोन्ही उबदार नट्स आहेत. यासाठी ते हिवाळ्यात खाण्यासाठी खूप चांगले मानले जातात. मात्र त्यांचे पौष्टिकता वेगळे वेगळे आहेत. जसे की बदाम हे फायबरचे एक उत्तम स्रोत आहेत, तर अंजीरमध्ये भरपूर प्रमाणात लोह असते. बदाम खाल्ल्याने स्मरणशक्ती सुधारते, ऊर्जा वाढते आणि वजन नियंत्रित होण्यास मदत होते. अंजीर अशक्तपणा कमी करण्यास, बद्धकोष्ठता दूर करण्यास आणि श्वसन प्रणाली मजबूत करण्यास देखील मदत करतात. हिवाळ्यातील गरजांनुसार तुम्ही यापैकी कोणताही एक नट्स निवडू शकता.

**ते कसे आणि किती प्रमाणात सेवन करावे?**

तज्ञ सांगतात की जर तुम्हाला सकाळी रिकाम्या पोटी बदाम किंवा अंजीर खायचे असतील तर ते रात्रभर भिजवून खा. तुम्ही बदाम सोलून संपूर्ण खाऊ शकता. अंजीर कच्चे खाऊ शकता. तुम्ही ४-५ बदाम आणि २ अंजीर खाऊ शकता. सकाळी त्यांचे सेवन केल्याने दिवसभर ऊर्जा टिकून राहते, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि शरीराला उबदारपणा आणि शक्ती मिळते.

# सोयाबीन काढणीचे गुत्ते घेतलेल्या माय माऊल्यांचेच शेतकऱ्याने काढले आर्थिक गुत्ते

## साध्य भोळ्या मजूर महिलांचा गैरफायदा घेऊन अधिकच्या श्रमाला जुंपण्याचा आखला डाव

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**

मौजे कोकळगाव ता. निलंगा येथील रहिवासी असलेले महिला मजूर मौजे सरवडी येथील रहिवासी असलेले शेतकरी वरसूकेत मोतीराम मोहिते व अशोक मोतीराम मोहिते यांच्या शेतात दिवाळीपूर्वी सोयाबीनचे गुत्ते काढण्यासाठी गेले होते,सदर गुत्त ५५ हजार रुपये या प्रमाणे ठरले होते,सदर ५ एकर सोयाबीन काढले व नंतर जास्त रान असल्याने सदर गुत्ते अंगावर पडत होते सदर शेतमालकाने फसवेगिरी करत भोळ्या मजूर महिलांना अधिक १४ पिशव्या असलेले रान ९ पिशव्याच आहे असे खोटे बोलून महिलांना कमी मोबदल्यात जास्तीचे काम करून घेण्यात पटाईत असलेले वरील दोन्ही महाशय फसवल्याची बाब पुन्हा मजूर महिलांना लक्षात येताच त्यांनी सदर रान जास्तीचे आहे तुम्ही आम्हाला फसवत आहे म्हणून मजूर गरीब महिलांच्या लक्षातच आले नाही, जास्त सोयाबीनचे शेत असल्याने सदर गूत्ते अंगावर पडत आहे आम्हाला सणापर्यंत काढणेही श्यक्य होणार नाही, तसेच इतर मजूर पण मिळत नाहीत म्हणून थोडीफार वाढीव रक्कम द्यावे अशी विनंती बिचाऱ्या मजूर माऊल्यांनी शेत मालकांना केली तरीही तो शिल्लक दाम तर दूरच.उलट तुम्हाला कुठे जायचे तिथे जावू शकता, मी इतरांना कितीही रुपये देईन पण तुम्हाला यापुढे एक फुटकी मणी सुद्धा देणार नाही.अशी धमकी देऊन

त्यामुळे सर्व मजूर महिलांनी नाविलाजस्त्व अंगावर पडत आहे म्हणून वापस गावी आले. त्यांना शेत मालकाकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही म्हणून सदर सोयाबीन काढणीचे अद्यापपर्यंत केलेले काम ३०,००० हजारांचे झाले आहे. फक्त ५ हजार इसारत म्हणून दिले आहे. आणखी २५००० रुपये येणे आहे. दिवाळी होऊन अद्याप पर्यंत तो जितके काम झाले आहे तेवढे तर मजूर महिलांचे पैसे द्या म्हणून वारंवार विनंती केली तरीही तो पैसे देण्याच्या प्रयत्नात तर नाहीच शिवाय महिलांना पैसे अजिबाद देणार नाही, तुम्हाला कुठे जायचे तिथे जावू शकता. मि इतर ठिकाणी हजारो रुपये देईन पण तुम्हाला देणार नाही अशी अपमानास्पद धमकी वजा तो करत आहे. यामध्ये कांहीं मजूर महिला कांहीं विधवा देखील आहेत,ज्यांचे हातावर पोट आहे अशा महिला व कांहीं विधवा मजूर महिला ज्यांचे काम केल्याशिवाय



कांहीच भागत नाही, अशा गरीब महिला दुसऱ्याने गुत्ते घेणाऱ्यांनी चला कामाला म्हणून सहज नेहल्या आहेत, अशा महिलांना मात्र उन्हातान्हात ५ एकर सोयाबीन काढले असता पदरी निराशा अपमानास्पद वागणूक, महिलांनाच उलटे बोलने अशा समस्यांना सामोरे जावे लागले आहे व त्यांना काम करून अन्याय सहन करावा लागत आहे. शेवटी मजूर महिलांनी आम्ही जितके काम केलेले आहे तितकेच पैसे द्या किंवा त्यांच्यापेक्षाही कमी तर द्या आम्ही सोसून घेऊ, पण आमच्या उन्हातान्हात घाम गाळून सकाळी सात ते सायंकाळी सात वाजेपर्यंत न थांबता काम केलेले आहे त्यामुळे देण्याची विनंती केली तरीही आज रोजी तीन महिने झाले तरीही पैसे देणार नाही या भूमिकेवर तो ठाम आहे. याउलट महिलांना कोणत्यातरी विषयाला धरून सुरुवातीला तुम्ही बोलले आणि गुत्तेच का काढले नाही या गोष्टीला धरून वाकडे बोलने दमदाटी करणे, काय करायचे आहे ते करून घ्या असे म्हणत बिचाऱ्या मजूर माय माउलीना अपमानास्पद हीन वागणूक देत आल्यामुळे राज्यात एकीकडे मुख्यमंत्री लाडकी मजूर भोळी भाबडी महिलांची आर्थिक पिळवणूक केली जाते तर मजूर बहिणीचा अपमानास्पद ग्रामीण भागात वागणूक मिळत असल्याचे चित्र पाहावयास मिळते आहे. यामुळे अशा अल्प मोबदल्यात जास्तीचे काम करून पटाईत असलेल्या महाशय कडून वेळेत पैसे मिळवून देऊन अशा मुजोर माय माऊलींचे आर्थिक शोषण करणाऱ्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा आगामी काळात संबधित कार्यालयावर किंवा शेतकरी वरसुकेत मोतीराम मोहिते, अशोक मोतीराम मोहिते यांच्या घरासमोर किंवा संबधित पोलीस कार्यालयासमोर अखिल भारतीय आदिवासी महर्षी वाल्मिकी संघटनेच्या वतीने तीव्र उपोषण करणार असल्याचा इशारा अखिल भारतीय आदिवासी महर्षी वाल्मिकी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

# शिरपुरच्या नाईक घराण्याने जिल्हा परीषद शाळेला स्वत:च्या मालकीची जागा देवून घडविला इतिहास

दैनिक वादळ वार्ता
**आर्णी । प्रतिनिधी**

दि२९ नोव्हेंबर तालुक्यातील शिरपुरच्या स्वर्गीय अलमसिंगजी नाईक (माजी सरपंच) व (माजी पंचायत समिती सदस्य दिग्रस) घराण्याने यापूर्वी सामाजिक बांधिलकी जपत शाळा बांधण्यासाठी जागा दिली.*

त्यांनी दिलेल्या जागेत शाळेची इमारत ऊभी असून आतापर्यंत या शाळेतून शिक्षण घेवून बरेच विद्यार्थी विविध ठिकाणी मोठ्या पदावर कार्यरत आहेत आणि आज रोजी जवळपास ८० विद्यार्थी सद्या स्थितीत शिक्षण घेत आहेत.परंतू विद्यार्थ्यांच्या शारिरीक विकासाच्या दृष्टीने त्यांना खेळण्यासाठी फार अपूरी जागा आहे.शाळेला मैदानच नसल्यामुळे शाळेच्या सौंदर्यात भर घालणे शक्य झाले नाही.नेमकी हीच समस्या शिक्षक व गावातील जाणकार मंडळीनी नाईक परीवाराकडे मांडली.सामाजिक बांधिलकीची जाण असणाऱ्या नाईक परीवाराने कोणतेच आढेवेढे न घेता विद्यार्थ्यांसाठी त्यांनी शाळेच्या प्रांगणासाठी स्वताच्या मालकीची स्वर्गीय अलमसिंगजी नाईक,स्वर्गीय मोतीरामजी नाईक,स्वर्गीय शांतीलालजी नाईक यांचे स्मृतिप्रीत्यर्थ




त्यांच्या परीवारातील दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाणारे बाबुलालजी नाईक, प्रकाशभाऊ नाईक,विनोद नाईक,माणिक नाईक, अरुणभाऊ नाईक,संतोष नाईक,परमेश्वर नाईक,योगेश नाईक,अक्षय नाईक, सारंग नाईक आदी नाईक परीवारांनी सामाजिक बांधिलकीतून शाळेच्या प्रांगणासाठी जागा दिल्याबद्दल आर्णी पंचायत समीतीचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी मा.रमेश खारोडे साहेब यांनी नाईक परीवारातील या सर्व सन्माननिय सदस्यांचा शाल,श्रीफळ बुके देवून पंचायत समिती आर्णी व जि.प.मराठी शाळा शिरपूर यांचे संयुक्त विद्यमाने सहृदय सत्कार केला.याप्रसंगी ग्राम विकास अधिकारी के.आर.आडे साहेब, मुख्याध्यापक विशाल दोडके,राज्यपुरस्कार प्राप्त शिक्षक आसाराम चव्हाण, बंडू ससाणे उपस्थित होते. कलीयुगात इंच इंच जागेला हजारो रूपयांची किंमत असतांना नाईक परीवाराने लाखो रुपयांची जागा शाळेच्या प्रांगणासाठी दान दिल्याबद्दल ग्रामपंचायत शिरपूर चे सरपंच,उपसरपंच तथा सर्व ग्रामपंचायतचे सदस्यगण व शाळाव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष तथा सर्व सदस्यगण यांचेसह संपूर्ण शिरपूर गावातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केल.

जि.प.मराठी शाळा,शिरपूर
पं.स.आर्णी जि.यवतमाळ

# औसा तालुक्यात बँक, मायक्रो फायनान्सच्या एजंटाची दादागिरी दिवसेंदिवस चालली वाढत

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

_औसा तालुक्यात मायक्रो फायनान्स विविधकंपन्यांच्या वसुली एजंटाची दादागिरी दिवसांनी दिवस वाढत चालली असून, एसबीआय स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नियमाची सरासरी पायमल्ली होत आहे. या कंपन्या ग्रामीण महिलांकडून कर्जाची वसुली करताना माणुसकी व कायद्याचे लहान विसरत आहेत. गावोगावी फिरणारे फायनान्स एजंट कर्जदार महिलांना फोन करतात आता तुम्ही कुठे आहेत तुम्ही लवकरात लवकर गट भरून जायचे असते घरचे परिवार काही कामानिमित्ताने किंवा बाहेर असतात. तरीही मायक्रो फायनान्स कंपनीकडून एजंटाद्वारे दादागिरी ची भाषा करतात. तर तुम्ही या घराकडे हप्ता भरा किंवा संध्याकाळी बोलावून घेतात पारावर कुणाच्यातरी घरी आणि रात्री उशिरापर्यंत अगदी दहा वाजेपर्यंत त्यांना कर्ज भेटण्यासाठी ताटकळत बसतात अनेक वेळा महिलांना सार्वजनिक ठिकाणी अपमानित सर्वासमोर केले जाते, वसुलीसाठी दबाव टाकला जातो. यामुळे त्यांच्या आत्मस्मानाला तडे जात असून महिला व पुरुष मानसिक त्रासही वाढतो आहे. पायमपल्ली इंक पश



स्पष्टपणे निदर्श दिले आहेत की, फायनान्स कंपन्यांनी वसुलीच्या वेळा सकाळी आठ ते संध्याकाळी सहा या वेळेत मर्यादित ठेवाव्यात तसेच वसुली कराना कोणत्याही गैर वर्तणूक ग्राहकाला धमकवणे अपमानित करने किंवा दबाव ट** गैरकारदेशीर गुन्हा आहे.मात्र याचे पालन होताना औसा तालुक्यात ग्रामीण भागात कुठेही दिसत नाही. यामुळे गोरगरीब व मध्यवर्गीय महिलांच्या जगण्यात भरड पट्टी वाढत आहे. सर्व संबंधित फायनान्स कंपन्याची सखोल चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्रस्त नागरिक करीत आहेत. महिलांची सुरक्षितता आणि आत्मसन्मान राखण्यासाठी स्थानिक प्रशासनाने तातडीने लक्ष घालणे गरजेचे आहे. याकडे प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन महिला भगिनी समोर वाढणारे देशातील घालावा अशा मागणीची चर्चा औसा तालुक्यात व ग्रामीण भागात होत आहे.

# कृषी विज्ञान केंद्र दहिगाव-ने येथे रोपवाटिका व्यवस्थापन या विषयावर प्रशिक्षण वर्ग संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

श्री मारुतराव घुले पा. शिक्षण संस्थेचे व भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली आयोजित कृषी विज्ञान केंद्र, दहिगाव ने येथे ग्रामीण युवकांसाठी नुकताच रोपवाटिका व्यवस्थापन या विषयावर पाच दिवसीय प्रशिक्षण वर्ग संपन्न झाला. या प्रशिक्षण वर्गात कार्यक्षेत्रातील २८ ग्रामीण युवक व युवतींनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत प्राप्त माहितीबद्दल समाधान व्यक्त केले.केंद्राचे कामकाज संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्रजी घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. श्यामसुंदर कौशिक यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. या प्रशिक्षण वर्गात प्रशिक्षणार्थींना रोपवाटिका व्यवस्थापन प्रशिक्षणामध्ये रोपवाटिका स्थापनेची कार्यपद्धती, जागेची निवड आणि पूर्वतयारी, रोपवाटिकेतील मातृवृक्षांची लागवड आणि संगोपन, रोपवाटिकेतील विविध हत्यारे व औजारे, रोपवाटिकेकेतील अभिवृद्धीसाठी माध्यमे, साहित्य व अभिवृद्धीगृहे, रोपवाटिका व्यवसायातील संधि व महत्व, रोपवाटीकेतील झाडांची अभिवृद्धी (प्रात्यक्षिक- डोळा भरणे व कलम करणे), रोपवाटीकेतील मजूर व्यवस्थापन, पुष्पगुछासाठी आवश्यक मातृवृक्षांची लागवड आणि संगोपन, पुष्पगुछ बनवणे प्रात्यक्षिक, संरक्षित शेती, भाजीपाला रोपवाटिका, रोपवाटिका एक स्टार्टअप बिझनेस मॉडेल, भाजीपाला, फळ तसेच सुशोभित झाडांच्या रोपवाटीकेस भेट, शासनाच्या रोपवाटिका विकासाच्या योजना, रोपवाटीकेतील वाफे आणि अभिवृद्धीगृहांचे निर्जंतुकीकरण, यशस्वी उद्योजगाचे गुण या प्रमुख विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राचे डॉ. एस.एस.कौशिक, श्री. माणिक लाखे, श्री. नारायण निबे, श्री. सचिन बडधे, इंजि. राहुल पाटील, श्री. प्रकाश बहिरट, श्री. प्रकाश हिंगे यांनी तसेच प्रशिक्षण वर्गाचे समन्वयक श्री नंदकिशोर दहातोंडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रशिक्षणार्थींना रोपवाटिका व्यवस्थापन करणाऱ्या सुलतानपूर येथील उद्योजक श्री. श्रीकांत खाटिक यांच्या मोरया हायटेक



नर्सरी, गेवराई येथील उद्योजक श्री. अभिषेक ताकवणे यांच्या ताकवणे पाटील हायटेक नर्सरी व जळके येथील उद्योजक श्री. विकास चावरे यांच्या गुरुदास ॲग्रो नर्सरी येथे भेटी देण्यात आल्या. प्रशिक्षण वर्गाचे समारोपावेळी सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. अशा प्रकारचे प्रशिक्षण वारंवार व्हावेत, प्रशिक्षणापासून आम्हाला नक्की फायदा होईल अशी भावना यावेळी काही प्रशिक्षणार्थींनी व्यक्त केली.ग्रामीण युवक व युवतींमध्ये उद्योजक वाढवण्यासाठी तसेच शेतीला पूरक व्यवसाय म्हणून रोपवाटिका व्यवस्थापन हा एक अत्यंत महत्त्वाचा व्यवसाय आहे. शेतक-यांना उत्तम दर्जाची कलमे रोपे पुरवण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने तयार केलेली रोपे पुरवठा करणे हे आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचे असून यास मोठ्या प्रमाणात वाव आहे असे यावेळी श्री नंदकिशोर दहातोंडे, प्रशिक्षण समन्वयक यांनी आवर्जून नमूद केले.

# मानसिक आजाराला बळी पडू नका-डॉ.जगदीश टेकाळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

जर तुमच्या कुटुंबात वडीलधारी व्यक्ती असतील तर त्यांचे प्रेम, आशीर्वाद आणि अनुभव इतर सदस्यांना आयुष्यात खूप मदत करतात. या वयात ते अनेकदा मानसिक आजाराला बळी पडतात. म्हणून, त्यांना या अवस्थेत पोहोचण्यापासून रोखण्यासाठी, लक्षणांवर लक्ष ठेवा. अशाच काही लक्षणांबद्दल आपण जाणून घेऊया.



* लोकांपासून दूर राहणे : जेव्हा एखादी वयस्कर व्यक्ती अचानक लोकांपासून दूर राहते, कमी संवाद साधते किंवा संवाद साधण्यास अडचण येते, तेव्हा ते मानसिक आजाराचे लक्षण असू शकते.

* या वर्तणुकीतील बदल (चिडचिडेपणा): जर ते सामाजिक परिस्थिती टाळू लागले आणि सहज अस्वस्थ, चिडचिडे किंवा चिडचिडे झाले तर हे देखील मानसिक आजाराचे लक्षण असू शकते

* स्वतःची काळजी न घेणे : जर एखाद्या व्यक्तीने वयानुसार स्वतःची काळजी, स्वच्छता आणि काळजी घेण्याकडे दुर्लक्ष करायला सुरुवात केली तर हे देखील मानसिक त्रासाचे लक्षण आहे.

* वजनात बदल : भूकेतील बदल, क्रियाकलाप पातळी, सतत कमी मूड, एकटेपणा, दुःख आणि सामाजिक अलगाव यामुळे अचानक वजन कमी होऊ शकते. हे देखील नैराश्याचे लक्षण आहे. जर एखाद्या व्यक्तीला वय वाढत असताना झोपेचा त्रास होत असेल तर हे मानसिक विकाराचे लक्षण असू शकते.

* मित्र परिवाराचा आभाव : सुसंवाद साधण्यासाठी मित्राची कमतरता.

असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

# महात्मा फुले यांच्या तजोमय विचाराने सत्यधर्माची पहाट उगवली-जेष्ठ विधितज्ञ अभय आगरकर

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महात्मा फुले यांनी अज्ञानाच्या अंधकारात खितपत पडलेल्या आणि अठरा विश्वे दारिद्रय उराशी असणार्या चक्रव्हुहात सापडलेल्या समाजाचा उद्धार केला. हजारो वर्ष बहुजन समाज गुलामगिरीच्या गर्तेत बुडालेला होता. जात-पात भेद मोठ्या प्रमाणावर वाढले होते, भारतीय समाज तेजोहीन झालेला होता. सर्वत्र सामाजिक गुलामगिरीचा अंधकार दाटलेल्या, गुलामीची जाणीव कोणालाच होत नव्हती, समाज अनिष्ट रूढी परंपरेत बुडालेला होता. अशावेळी महात्मा ज्योतीबा फुले यांच्या रुपाने समाजाला एक आशेचा किरण दिसला. आणि त्यांच्या तजोमय विचाराने सार्वजनिक सत्यधर्माची पहाट उगवली. समाज परिवर्तनाची नांदी



घेऊन खितपत पडलेल्या समाजाला उत्सर्जित अवस्था प्राप्त करुन देण्याचे काम महात्मा फुले यांनी केले, असे प्रतिपादन श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानचे अध्यक्ष जेष्ठ विधितज्ञ अभय आगरकर यांनी केले.क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरच्यावतीने माळीवाडा येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष जेष्ठ विधितज्ञ अभय आगरकर ,उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, , पांडूरंग नन्नवरे, , ज्ञानेश्वर रासकर, रंगनाथ फुलसोंदर , प्रा.माणिकराव विधाते, नितीन पुंड, कुमारसिह वाकळे ,गणेश राऊत, आनंद पुंड आदि उपस्थित होते. याप्रसंगी अशोकराव कानडे म्हणाले, शेतकरी आणि बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी करणारे आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. सत्यशोधक समाजाची स्थापना करणारे आणि आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी वेचणार्या जोतिबा फुले यांना जनतेने 'महात्मा' पदवी बहाल केली. त्यांचे विचार आणि कार्य सर्वांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहील, असे सांगितले.

# तळोद्यातील 'जहागीरदारी'चा मुद्दा थेट 'दत्तक' घोषणेने संपुष्टात!

## जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांचा तळोदा निवडणुकीत मास्टरस्ट्रोक

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज भारतीय जनता पक्षाचे (भाजप) स्टार प्रचारक तथा राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी तळोद्यात घेतलेली प्रचारसभा अत्यंत गाजली. केवळ प्रचारापुरती मर्यादित न राहता, महाजन यांनी येथील जनतेला भेडसावणाऱ्या एका महत्त्वाच्या व ज्वलंत प्रश्नाची थेट जबाबदारी स्वीकारून, तळोद्याला एक मोठा राजकीय दिलासा दिला आहे. या घोषणेमुळे तळोदा शहराचे राजकारण ढवळून निघाले आहे.

दिनांक २९ नोव्हेंबर रोजी दुपारी ठीक १ वाजून ४५ मिनिटांनी तळोदा येथे भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ या भव्य सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेला प्रचंड गर्दी जमली होती. याप्रसंगी शहादा तळोदा मतदारसंघाचे आमदार राजेश पाडवी,प्रदेश महामंत्री विजय चौधरी, नंदुरबार जिल्हाध्यक्ष निलेश माळी,प्रदेश कार्यकारणी सदस्य शशिकांत वाणी, माजी नगराध्यक्ष अजय परदेशी, भाजपाचे ज्येष्ठ सदस्य सुहास नटावदकर, तळोदा नगरपरिषद भाजप नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जितेंद्र सूर्यवंशी तसेच भाजपचे २१ उमेदवार, यांची प्रमुख उपस्थिती होती.सभेतील भाषणादरम्यान स्थानिक आमदार राजेश पाडवी यांनी अत्यंत महत्त्वाचा व संवेदनशील मुद्दा उपस्थित केला. त्यांनी मंत्री महोदयांसमोर तळोद्यातील जनतेला अनेक वर्षांपासून भेडसावणारा 'जहागीरदारी'चा मुद्दा उचलून धरत, हा प्रश्न सोडवण्यासाठी महाजन यांच्या सक्रिय हस्तक्षेपाची मागणी केली.

तळोदा येथील हा मुद्दा दीर्घकाळ प्रलंबित होता. जलसंपदा मंत्र्यांनी तो थेट दत्तक घेऊन दोन महिन्यांत सोडवण्याची घोषणा केल्यामुळे, केवळ स्थानिक निवडणुकीत भाजप उमेदवारांना मोठा आधार मिळाला आहे असे नाही, तर तळोदा शहरातील जनतेला




एका मोठ्या राजकीय-सामाजिक समस्येतून बाहेर पडण्याचा विश्वास मिळाला आहे. महाजन यांच्या रूपाने थेट राज्याचा एक प्रभावी मंत्री तळोद्याच्या विकासाची जबाबदारी घेत असल्याने, निवडणुकीच्या निकालांवर याचा निर्णायक परिणाम होण्याची शक्यता आहे.

आपल्या भाषणाच्या समारोपात महाजन यांनी तळोद्याच्या जनतेला सांगितले की, राज्यात भाजपचे सरकार आहे आणि त्याचबरोबर देशातही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचेच सरकार आहे. त्यामुळे तळोद्याच्या विकासासाठी आणि प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी जनतेने देखील भाजपलाच निवडून द्यावे.तत्पूर्वी, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जितेंद्र सूर्यवंशी, भाजपचे जिल्हाध्यक्ष निलेश माळी व प्रदेश महामंत्री विजय चौधरी यांनीही मनोगत व्यक्त करत भाजपच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. मात्र, संपूर्ण सभेचे केंद्रबिंदू गिरीश महाजन यांची 'तळोदा दत्तक' आणि 'जहागीरदारी' संपुष्टात आणण्याची घोषणा राहिली.

> **आमदार पाडवी यांनी उपस्थित केलेल्या या मुद्द्यावर जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी आपल्या भाषणात अत्यंत धडाकेबाज घोषणा केली. त्यांचे तळोद्यातील हे पाऊल त्यांच्या निर्णायक नेतृत्वाचे दर्शन घडवणारे ठरले आहे. मंत्री महाजन म्हणाले, मी आज या सभेच्या माध्यमातून तळोद्याला दत्तक घेत आहे. एवढेच नाही, तर त्यांनी तळोद्यातील जनतेला विश्वास देत, येत्या दोन महिन्यात कुठल्याही परिस्थितीत जहागीरदारीचा हा ज्वलंत मुद्दा मी सोडवणारच असल्याचे उपस्थित जनसमुदायासमोर ठामपणे सांगितले.**

## ऊसदर वाढीसाठी बीड जिल्ह्यात आंदोलन तीव्र

# अंबाजोगाई,येडेश्वरी व गंगामाऊली साखर कारखान्यांना शेतकरी संघर्ष समितीची भेट

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात ऊस दर वाढीच्या मागणीसाठी सुरू असलेले आंदोलन बुधवारी अधिक तीव्र झाले.शेतकरी संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना,येडेश्वरी साखर कारखाना व गंगा माऊली साखर कारखाना यांच्या चेअरमन तसेच संचालकांची भेट घेऊन तातडीने ऊसाचा भाव जाहीर करण्याची विनंती केली.समितीच्या म्हणण्या नुसार ऊसदर प्रश्नावर कारखानदारांकडून अद्याप स्पष्ट भूमिका न घेतल्यामुळे शेतकऱ्यां मध्ये तीव्र नाराजी आहे. सुरू असलेल्या संघर्षाला पाठिंबा म्हणून समितीने तिन्ही साखर कारखान्यांना ऊस पुरवठा करणाऱ्या सर्व



शेतकरी बांधवांनी तसेच वहातूक ठेकेदारांनी तोडणी व वाहतूक तात्काळ थांबवावी,अशी विनंती केली आहे.

आंदोलनाचे नेतृत्व करणारे भाई मोहन गुंड यांनी सांगितले की,ऊस दर वाढ हा शेतकऱ्यांचा हक्क असून योग्य भाव मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहील. शेतकऱ्यांची व्यथा शासन व कारखानदारांपर्यंत पोहोचवण्यासाठी संघर्ष समिती ठाम भूमिका घेत आहे.दरम्यान,आंदोलना मुळे साखरकारखान्यांच्या कामकाजावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.तसेच शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी शनिवारी पहाटे माळेगाव येथे ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ची वहातुक थांबवली असल्याचे समजले आहे.

# निर्दयी मारेकऱ्यांना कठोर शिक्षा हीच स्व.संतोष देशमुखांना खरी श्रद्धांजली ठरेल!

## प्रथम स्मृतिदिनानिमित्त राजेभाऊ फड व दीपक नाना देशमुख यांचे अभिवादन

दैनिक वादळ वार्ता

**परळी (प्रतिनिधी)**

मस्साजोग ग्रामपंचायतीचे कर्तबगार व लोकाभिमुख सरपंच स्वर्गीय संतोष अण्णा देशमुख यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड आणि परळी नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष, पक्षनेते दीपक रंगनाथ देशमुख यांनी मस्साजोग येथे त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण अभिवादन केले. पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचीही यावेळी उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान स्व.संतोष अण्णा देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांना दोन्ही नेत्यांनी आधार देत सांत्वन केले. स्वर्गीय अण्णांच्या आठवणींनी परिसर भारावून गेला असून अनेकांच्या डोळ्यात अश्रू



दाटले.संतोष अण्णा देशमुख यांच्या निर्घृण हत्येला एक वर्ष पूर्ण झाले असले, तरी गुन्हेगारांना आजतागायत शिक्षा न झाल्याबद्दल उपस्थितांनी तीव्र खेद व्यक्त केला. संतोष अण्णा यांच्या मारेकऱ्यांना आजपर्यंत कठोर शिक्षा मिळाली असती, तर हाच दिवस त्यांना खरी भावांजली ठरला असता, असे अंतःकरणाला भिडणारे शब्द दीपक नाना देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले. राजेभाऊ फड यांनीही संतोष अण्णांच्या कार्याची आठवण करून देत न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली. गावाच्या विकासासाठी झटणाऱ्या एका समर्पित सरपंचाची झालेली हत्या हे संपूर्ण क्षेत्रासाठी दु:खद असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# माजलगाव तालुक्यातील दिद्रूड येथे महिलांनी केला संविधान दिन साजरा




दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील दिदृड येथे संविधान दिन साजरा करण्यात आला यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले. तसेच संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचनदेखील करण्यात आले.त्यानंतर शहरातील मुख्य ठिकाणावरून संविधानाच्या प्रतिमेची मिरवणूक काढत संविधानिक मूल्यच्या घोषणा देत राजरत्न बौध्द विहार याठिकाणी सांगता करण्यात आली यावेळी आयु सजीवणी बाबासाहेब देशमाने, कु. शिवानी ज्ञानोबा देशमाने, आयु. रिठा सिद्धार्थ मायदळे, आयु सुनीता बालासाहेब देशमाने, आयु मीरा संभाजी देशमाने, आयु मुक्ता अर्जुन मायदळे, आयु सुशीला अर्जुन देशमाने, जनाबाई चांदमारे,आयु मदाकिनी दिनेश देशमाने, आयु प्रभावती देशमाने, आयु इंदुबाई ज्ञानोबा देशमाने,सुनीता विठ्ठल देशमाने,आयु प्रेरणा सचिन देशमाने, कु नंदनी संजय देशमाने, कु दिक्षा बाबासाहेब देशमाने, कार्यक्रम यशस्वी केला,तसेंच वंचित बहुजन आघाडीचे तालुका संघटक रामकुमार बप्पा देशमाने यांनी ह्या सर्व कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# प्रभाग १३ मध्ये प्रचंड उत्साह; कॉर्नर बैठकीचे जाहीर सभेत रूपांतर

## सय्यद अफसानाबी व उषा लांडगे यांच्या विजयाची चिन्हे स्पष्ट!

दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । दर्शन डोंगरे**

नगरपालिकेच्या निवडणुकीत अंतिम टप्प्याला वेग आला असून प्रभाग क्रमांक १३ मधील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या उमेदवारांच्या प्रचाराला जबरदस्त उत्साह लाभत आहे. आझाद नगर परिसरातील साधी कॉर्नर बैठक काल अचानक भव्य जाहीर सभेत परिवर्तित झाली आणि या दोन्ही उमेदवारांच्या प्रचाराला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार सय्यद अफसानाबी सलीम बापू आणि उषा अशोक लांडगे यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेली ही कॉर्नर बैठक सामान्यतः छोट्या स्वरूपाची असावी अशी अपेक्षा होती. मात्र स्थानिक नागरिकांचा ओघ इतका प्रचंड होता की



काही वेळातच ही बैठक जाहीर सभेच्या स्वरूपात बदलली. उपस्थित नागरिकांनी उमेदवारांना जबरदस्त पाठींबा दर्शवत प्रभाग १३ मध्ये दोन्ही महिला उमेदवारांचा विजय 'आजच निश्चित' असल्याचे वातावरण तयार केले.सभेला सहाल चाऊस, बाबुराव पोटभरे, नारायणराव डक, श्रीहरी मोरे आणि सय्यद सलीम बापू यांची प्रमुख उपस्थिती राहिली.

या वेळी सहाल चाऊस म्हणाले, या भागातील सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी आमचे खास लक्ष आहे. नगराध्यक्ष पदासाठी आमचे शिफा बिलाल चाऊस आणि नगरसेवक पदासाठी सय्यद अफसानाबी व उषा लांडगे यांना मतदारांनी आशीर्वाद द्यावा, अशी विनंती त्यांनी केली.तसेच बाबुराव पोटभरे म्हणाले, या भागासाठी आमचे घर सदैव उघडे आहे. लवकरच गौतम नगरमध्ये स्वखर्चाने भव्य पुतळा उभारण्याचा शब्द मी देतो, मात्र त्यासाठी आपले प्रचंड मतांचे समर्थन आवश्यक आहे, असे आवाहन त्यांनी केले.सभेला मिळालेल्या अपूर्व प्रतिसादामुळे विरोधकांच्या खांद्यावर चिंता स्पष्ट दिसत आहे. मतदारांचा कल पाहता दोन्ही उमेदवारांना मोठ्या मतांनी विजय मिळेल, अशी चर्चा सर्वत्र आहे. यामुळे घाबरलेले विरोधक आता खालच्या पातळीवर जाऊन टीका करत असल्याचेही समोर येत आहे.२ डिसेंबर रोजी मतदान होणार असून अध्यक्ष व २६ नगरसेवक या निवडणुकीत निवडले जाणार आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग १३ मध्ये निर्माण झालेली ही प्रचंड उत्साहाची लाट येत्या निकालाची दिशा बऱ्याच अंशी स्पष्ट करताना दिसत आहे.

# मंत्री श्री. नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते 'शिखर यात्री' लघुपट पोस्टर प्रकाशन संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**रविंद्र वळवी । मोलगी**

सातपुड्याच्या अतिदुर्गम भागातील बालाघाट या छोट्याशा खेड्यातील आदिवासी युवक अनिल मानसिंग वसावे यांच्या जागतिक शिखरांवरच्या प्रेरणादायी प्रवासावर आधारित 'शिखर यात्री – एक आदिवासी युवा ब्रँड' या लघुपटाचे पोस्टर प्रकाशन अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते मंत्रालयाच्या दालनात संपन्न झाले.

या पोस्टर प्रकाशन प्रसंगी आंतरराष्ट्रीय गिर्यारोहक अनिल वसावे, मीडिया एक्सपर्ट व लघुपटाचे दिग्दर्शक शंकर बारवे, निर्माती निशा बारवे, ना. नरहरी झिरवाळ यांचे खाजगी सचिव डॉ.




रामदास गाडे, विशेष कार्य अधिकारी प्रकाश सुपे, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय गिऱ्यारोहक अनिल वसावे यांनी आफ्रिका खंडातील माऊंट किलीमांजरो, युरोपमधील माऊंट एल्ब्रस, हिमालयातील सतोपंथ, कीअग्री-स्पँगनाग्री अशा अनेक शिखरांवर यशस्वी चढाई केली आहे. ते महाराष्ट्रातील आणि विशेषतः खानदेशातील पहिले आदिवासी गिर्यारोहक असून सध्या माऊंट एव्हरेस्ट व माऊंट ल्होत्से या दुहेरी 'अष्टहजारी' मोहिमेसाठी तयारी करत आहेत. लघुपट पोस्टर प्रकाशना वेळी मंत्री ना. झिरवाळ म्हणाले, अनिल वसावे यांनी अतिदुर्गम भागातून अत्यंत हालाखीची परिस्थिती असतांना देखील केवळ जिद्दीच्या जोरावर जागतिक शिखरांवर पोहोचून आदिवासी समाजातील युवकांसाठी नवा आदर्श निर्माण केला आहे. 'शिखर यात्री' हा माहितीपट केवळ त्यांच्या यशाची कहाणी नाही, तर प्रत्येक वंचित भागातील तरुणाला मोठी स्वप्नं पाहण्याचं धाडस देणारा प्रेरणास्रोत आहे. अशा कार्यकर्तृत्वाला प्रोत्साहन देणे हीच खरी समाजसेवा आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त करून अनिल वसावे यांना भविष्यातील सर्व मोहिमांसाठी शुभेच्छा दिल्या. एस.बी. प्रोडक्शन प्रा. लि.च्या माध्यमातून दिग्दर्शक शंकर बारवे आणि निर्माती निशा बारवे यांनी हा माहितीपट साकारला असून लवकरच तो सोशल मीडियावर सर्वांसाठी उपलब्ध होणार आहे. आदिवासी युवक, विद्यार्थी आणि गिर्यारोहण प्रेमींसाठी हा लघुपट प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# घुंगराळा यात्रेत कुस्तीचा थरार अच्युत टरके 'खंडोबा केसरी'

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । प्रतिनिधी**

घुंगराळा (ता. नायगाव) येथे झालेल्या पारंपरिक कुस्ती महोत्सवात प्रचंड उत्साहाच्या वातावरणात किवळा येथील अच्युत टरके यांनी दिल्लीच्या नामांकित पहिलवान नुकूल याला पराभूत करून 'खंडोबा केसरी' किताब पटकावला. ३१,१११ रुपयांचे रोख बक्षीस असलेल्या या मानाच्या कुस्तीचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांच्या तर्फे करण्यात आले होते.

स्पर्धेचे उद्घाटन कुंटूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल भोसले यांच्या हस्ते झाले. तब्बल २५०-३०० कुस्त्या रंगलेल्या या महोत्सवात हिंगोली, वाशीम, पंजाब, दिल्ली,



लखनऊसह नांदेड येथील पहिलवानांनी जोरदार मुकाबले सादर केले. ३ ते ४ हजार कुस्तीप्रेमींनी मैदान गजबजले होते. पंच, आयोजक तसेच ग्रामस्थांच्या उत्तम नियोजनामुळे स्पर्धेला यश मिळाले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077